# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## सविस्तर जाहिरात

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई या कार्यालयात तीन प्रादेशिक विभागातील कामाव्यतिरिक्त जल जीवन मिशन या महत्वांकाक्षी प्रकल्पा अंतर्गत यांत्रिकी कामे तसेच नव्याने IOT ची कामे पुर्ण करावयाची आहेत. तसेच ई कार्यालय सुरु करण्याच्या दृष्टीने नवीन / जुन्या दस्तऐवज व कागदपत्रे व्यवस्थितरित्या स्कॅनिंसाठी देणे व घेणे. म.जी.प्रा. अंतर्गत मान्यताप्राप्त उत्पादक ठरविणे व कंत्राटदार नोंदणीसाठी नव्याने संगणक ई प्रणाली विकसित केलेली असून ही प्रणाली अधिक कार्यक्षम करणेचेही महत्वपुर्ण काम करणे तसेच अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), मजीप्रा सिडको भवन, नवी मुंबई यांनी सोपविलेली कामे करीता १ वर्षासाठी कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता (यांत्रिकी) यांची सामान्य प्रशासन विभागाचे दि.१७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्ती करावयाची आहे. शासन निर्णयातील नियमानुसार सेवानिवृत्त नियुक्त अभियंत्यांना मासिक, परिश्रमीक व इतर भत्ते देय राहतील. या कामासाठी ३ वर्षाचा शासकीय कार्यालयात कार्यरत असल्याचा अनुभव असलेले यांत्रिकी संवर्गातील इच्छूक सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांचेकडून विहित नमुन्यात, करार पध्दतीने नियुक्तीकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ) विहीत नमुन्यातील अर्ज दि.७.१.२०२५ ते ९.१.२०२५ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावा व सदरचा भरलेला अर्ज दि.१४.१.२०२५ पर्यत दुपारी ३.०० वाजेपर्यत स्विकारला जाईल. यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

ब) मुलाखतीचा दिनांक १५.१.२०२५, स्थळ : मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई

**अटी व शर्ती :**

१) सदर नियुक्ती १ वर्षाकरीता सा.प्र.वि. शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येईल.

२) अर्जदार सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता (यांत्रिकी) संवर्गातील असावेत.

३) वर उल्लेख केलेल्या कामाचा किमान ३ ते ५ वर्षाचा अनुभव असावा.

४) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) उमेदवार ठाणे/पालघर/रायगड जिल्हयातील राहणारा असावा.

७) आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छूक सेवा निवृत्त अभियंत्यांनी सदर पदाकरीता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

८) उमेदवारांनी त्यांचे अर्ज सदर पदाकरीता वृत्तपत्रातील माहिती पाहून estt6mjp@gmail.com या मेल आयडीवर प्रत्यक्ष जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांच्या आत सादर करावेत.

९) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त यांत्रिकी अभियंता यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही अथवा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

१०) मुलाखातीव्दारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबत संपूर्ण अधिकार विभागास राहतील.

११) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त यांत्रिकी अभियंता यांना अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (यांत्रिकी), बेलापूर यांचे अंतर्गत काम करावे लागेल.

१२) नियुक्त केलेल्या अभियंत्यास अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (यांत्रिकी), बेलापूर यांच्या नियंत्रणाखाली काम करावे लागेल व कामकाजाचा अहवाल दरमहा सादर करावा लागेल.

१३) इतर अटी व शर्ती साप्रवि शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे राहतील.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

अर्जाचा नमुना

सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता (स्थापत्य) यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता अर्ज

| अर्जदाराचा अलिकडील काळाचे छायाचित्र |
|---|

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :-

२. अर्जदाराचा पत्ता :-

३. भ्रमणध्वनी क्रमांक :-

४. जन्मदिनांक व वय :-

५. सेवानिवृत्ती दिनांक व कार्यालय :-

६. सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-

७. विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय :-

८. मुळ निवृत्ती वेतन (निवृत्तीवेतन मिळत असलेल्या आदेशाची प्रत जोडावी.) :-

९. शैक्षणीक अर्हता :-

१०. अनुभव :-

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागातील मध्यवर्ती कार्यालयात जाहिरातीमध्ये नमुद केलेली कामे करणे व संबंधीत नियंत्रण अधिकारी यांनी सुचविलेली कामे करणे इत्यादी हाताळण्याकरीता ज्ञान व माहिती असलेल्या अनुभवी गट-ब या संवर्गातील कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता (यांत्रिकी) पदावरून सेवानिवृत्त झालेल्या व तशा प्रकारच्या कामाकाजाचा ३-५ वर्षाचा अनुभव असलेल्या कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता (यांत्रिकी) यांची करार पध्दतीने १ वर्षासाठी म.जी.प्रा.च्या मध्यवर्ती कार्यालयांतर्गत करार पध्दतीने नियुक्ती करावयाची जाहिरात / सुचना मी काळजीपूर्वक वाचली असुन सदर जाहिरातीतील/ सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची स्वाक्षरी व नाव.